<u>प्रेसनोट</u> दि. ०७/११/२०२४

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून पुणे पोलीस घटकातील समर्थ वाहतुक विभागामधील सहायक पोलीस फौजदार व ट्राफीक वॉर्डन यांचेवर लाच मागणी प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | समर्थ पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. २३८/२०२४. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७, १२ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ३७ वर्ष. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) अनिस कासम आगा, वय ४८ वर्ष, पद - ट्राफीक वॉर्डन, समर्थ वाहतुक विभाग, रा. कोंढवा, पुणे. (खाजगी इसम)<br>२) किरण दत्तात्रय रोटे, वय ५१ वर्ष, पद - सहायक पोलीस फौजदार, समर्थ वाहतुक विभाग, पुणे शहर. (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,०००/- (एक हजार) रुपये |
| पडताळणीअंती लाच मागणी रक्कम | ७००/- (सातशे) रुपये |
| पडताळणी दिनांक | दि. ११/१०/२०२४ रोजी |
| ठिकाण | समर्थ वाहतूक विभाग, पुणे शहर. |
| तपास अधिकारी | श्रीमती भारती मोरे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. ९८७०१५६५८६) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी नो पार्कीगमध्ये लावलेल्या त्यांच्या स्विफ्ट डिझायर गाडीला लावलेले जॅमर काढणेसाठी आरोपी खाजगी इसम अनिस आगा (ट्राफीक वॉर्डन) यांनी तक्रारदार यांचेकडे १,०००/- रुपयाची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारदार यांच्या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, आरोपी क्र. १ अनिस आगा (ट्राफीक वॉर्डन) यांनी तक्रारदार यांच्याकडे १,०००/- रुपयांची मागणी करुन तडजोडीअंती ७००/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले. तसेच आरोपी क्र. १ अनिस आगा (ट्राफीक वॉर्डन) कार्यालयात उपस्थित नसताना लोकसेवक सहा. पो. फौज. किरण रोटे यांनी "अनिस आगा यानी मागितलेले पैसे माझ्याकडे दे," असे म्हणून लाच घेण्यास संमती दर्शवून अपप्रेरणा दिल्याचे निष्पन्न झाल्याने आज दि. ०७/११/२०२४ रोजी लोकसेवक सहा. पो. फौज. किरण रोटे व खाजगी इसम (ट्राफीक वॉर्डन) अनिस आगा यांचेवर समर्थ पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

७/११/२४

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.